महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ७३८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३०/१०/२०१७

### १) प्राणी क्रुरतेने वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २९/१०/२०१७ चे ०५.०० वाजता दरम्यान यातील आरोपीने त्याचे ताब्यातील बोलेरो पिकअप क्रमाक एमएच ४०एल १८६८ या गाडी मध्ये २ जर्सीचे गोरे किंमती ६,०००/–रु. चे भरुन क्रुरतेने वागणुक करुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने वाहनासह असा एकुण किंमती २,०६,०००/–रु. चा माल मिळुन सरतर्फे फिर्यादी पोउपनि. चेके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ५(अ)(ब)/९ महा.प्रा.स.अधि १९७६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गदादे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

### २) विषारी औषध प्राशन करुन औषधोपचारा दरम्यान युवकांचा मृत्यु . :–

दिनांक ०२/१०/२०१७ चे १४.०० वाजता दरम्यान यातील मृतक अतुल प्रभु सती बावणे वय २१ वर्ष, रा. भेंडाळा याने घरी दारुचे नशेत कोणतीतरी विषारी औषध प्राशन करुन प्रकृती खराब झाल्याने त्यास औषधोपचारा करीता ग्रा. रु पवनी व सा. रु. भंडारा येथे उपचार करुन नंतर रेफर केल्याने मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता दिनांक ११/१०/२०१७ चे १०.३० वाजता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पोस्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र जा. क्र. क्रमांक ५९९/१७ दिंनाक २३/१०/२०१७ अन्वये प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. कन्नाके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. चुटे पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

### ३) अचानक प्रकृती खराब झाल्याने इसमाचा मृत्यु . :–

दिनांक ०३/१०/२०१७ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील मृतक दामोधर चिधुंजी उरकुडे वय ६२ वर्ष, रा. मुंढरी खुर्द याची अचानक प्रकृती खराब झाल्याने त्यास औषधोपचारा करीता मेयो दवाखाना नागपुर येथे नेले असता डॉक्टरने तपासुन मृत घोषीत केल्याने पो.स्टे तहसिल नागपुर शहर येथे मर्ग मर्ग क्र. ००/१७ चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. सोलंकी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कटरे पो.स्टे करडी हे करीत आहेत.

### ४) औषधोपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु . :–

दिनाक २८/१०/२०१७ चे २३.०० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. दामीनी दशरथ दोनाडकर वय २४ वर्ष, रा. दहेगाव हिची प्रकृती बिघडल्याने तिला औषधोपचारा करीता गा. रु. लाखांदुर येथे उपचार करुन तेथुन सा. रु भंडारा येथे रेफर करुन भरती केल्याने उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे भंडारा येथे मर्ग मर्ग क्र. ००/१७ चे कागदपत्र पो. शि. १२३८ यांचे हस्ते प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. यादव पो.स्टे दिघोरी हे करीत आहेत.

### ५) अंगावर मातीचे तेल टाकुण जळाल्याने औषधोपचारा दरम्यान मुलीचा मृत्यु . :–

दिनाक २९/१०/२०१७ चे ०७.४५ वाजता दरम्यान यातील मृतक कु. साक्षी दादाराम भुरे वय १० वर्ष, रा. व तिची बहीन हीचे सोबत खेळता खेळता मृतक ही चिडुन स्वत:चे अंगावर मातीचे तेल टाकुण ६० टक्के जळाल्याने तीला औषधोपचारा करीता सा. रु. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. बिनझाडे पो. स्टे. सिहोरा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. बोरकर पो.स्टे सिहोरा हे करीत आहेत.

**६) सार्वजनीक ठिकाणी वाहन थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस अडथडा व लोंकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २९/१०/२०१७ चे १४.३० ते १५.२० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील काळी पिवळी वाहन ही आम रोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल, अश्या स्थितीत वाहन उभी करतांनी मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पो. शि. गभणे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. हेमने पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**७) दारु पिवुन दारुचे नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २९/१०/२०१७ चे १८.१५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे स्टॉपसह नाकाबंदी डयुटी करत असतांनी आरोपीने त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर भरधाव, वेगाने, निष्काळजीपणे वाकडे तिकडे चालवुन स्व:तचे व ईतर लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अश्या प्रकारे दारु पिवुन दारुचे नशेत ट्रॅक्टर चालवितांनी मिळुन आल्याने डॉक्टरी परीक्षण व रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम १८४,१८५ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. इंगळे पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :**

दिनांक २९/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी १० तीन सिटर वाहनांवरती १३ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १०५ केसेस करण्यात आले आहे.

30.10

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता